दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

महाविकास आघाडीत फूट, परस्परांविरोधात अर्ज दाखल

मुंबई: विधान परिषदेच्या पाच जागा एकत्रितपणे लढवण्याचा निर्णय घेतल्यानंतर काही दिवसांतच महाविकास आघाडीतील मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. अमरावती शिक्षक आणि मराठवाडा पदवीधर मतदारसंघांत मविआतील घटकपक्षांनी परस्परांच्या उमेदवारांविरोधात अर्ज दाखल केल्याने मैत्रिपूर्ण लढतीची शक्यता निर्माण झाली आहे. अमरावतीत काँग्रेस आणि उबाठा, तर मराठवाड्यात उबाठा आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आमनेसामने आले आहेत.

नाना पाटेकर आणि नाशिकचा खास ऋणानुबंध

नाशिक : ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाच्या वृत्ताने कला आणि मनोरंजन क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. वयाच्या ७५व्या वर्षी गोव्यात हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाहे. त्यांच्या निधनानंतर विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून श्रद्धांजली व्यक्त केली जात आहे. नाना पाटेकर यांचे अनेक शहरांशी जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यापैकी नाशिकशी असलेले त्यांचे नातेही विशेष होते. तीर्थक्षेत्र आणि द्राक्षनगरी म्हणून ओळख असलेल्या नाशिकला साहित्य, रंगभूमी, चित्रपट आणि सामाजिक चळवळींचीही समृद्ध परंपरा लाभली आहे.

छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. ०९ ऑक्टोंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १६८ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

सॅमसंग गॅलॅक्सी टॅब एस 12 सिरीज उपलब्ध

गुरुग्राम : सॅमसंग इंडियाने आज गॅलॅक्सी टॅब एस१२ सिरीजच्या विक्रीची घोषणा केली, जी शक्तिशाली कार्यक्षमता आणि अल्ट्रा-थिन डिझाइनमध्ये आधुनिक गॅलॅक्सी एआयची सांगड घालणारा सॅमसंगचा आजपर्यंतचा सर्वात सक्षम आणि वैविध्यपूर्ण टॅबलेट अनुभव देते. हे नवीन टॅबलेट्स ग्रे आणि सिल्व्हर या रंगांच्या पर्यायांमध्ये उपलब्ध असतील.गॅलॅक्सी टॅब एस१२ सिरीज खरेदी करणारे ग्राहक अनेक फायद्यांचा लाभ घेऊ शकतात, ज्यामध्ये मल्टि-बाय ऑफर्सचा समावेश आहे: गॅलॅक्सी झेड फोल्ड८, गॅलॅक्सी झेड फोल्ड८ अल्ट्रा, गॅलॅक्सी एस२५ अल्ट्रा किंवा एस२५+ यांसह टॅब आणि स्मार्टफोन खरेदीवर १५,००० रुपयांची सूट; निवडक वेअरेबल्सवर १५ टक्के सूट; प्रो कीबोर्ड कव्हरवर ३० टक्के सूट; ५,००० रुपयांपर्यंत बँक कॅशबॅक; ५,००० रुपयांपर्यंत अपग्रेड बोनस; आणि सहभागी बँका तसेच एनबीएफसी भागीदारांमार्फत २४ महिन्यांपर्यंत नो-कॉस्ट ईएमआय सुविधा उपलब्ध आहे.

इथेनॉल उत्पादनाला सुरुवात


मुंबई: सनब्रिज बायोएनर्जी लिमिटेड या सनब्रिज ग्रुपच्या बायोएनर्जी शाखेने मध्य प्रदेशमधील सिवनी येथील आपल्या धान्यावर आधारित, फ्युएल-ग्रेड इथेनॉल उत्पादन प्लांटमध्ये व्यावसायिक उत्पादनाला सुरुवात केली आहे. हे पाऊल भारताच्या बायोफ्युएल क्षेत्रातील कंपनीचा सक्रिय सहभाग, तसेच बायोएनर्जी प्रवासातील महत्त्वपूर्ण टप्पा ठरले आहे. सिवनी येथील प्लांटची उत्पादन क्षमता प्रतिदिन ३०० किलोलीटर (केएलडी) आहे आणि ११,००० किलोलीटर साठवणूक (स्टोरेज) क्षमता आहे, तसेच हा प्लांट अंदाजे १,१७,५६० चौरस मीटर क्षेत्रात पसरलेला आहे. छत्तीसगडमधील रायपूर येथे लवकरच सुरू होणाऱ्या ४०० केएलडी क्षमतेच्या प्रकल्पामुळे कंपनीचा एकूण इथेनॉल पोर्टफोलिओ अधिक दृढ होईल, ज्यासह ही क्षमता ७०० केएलडीपर्यंत पोहोचेल.

सर्वात कमी किमतींसह डील्स

बंगळुरू : ॲमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्हलसाठी वेळेआधी मिळणाऱ्या डील्स आताॲमेझॉन डॉट इन वर सुरू झाल्या आहेत, ज्यामुळे लाखो उत्पादनांवर वर्षातील सर्वात कमी किमती मिळत आहेत. जलद गतीने पोहोचवल्या जाणाऱ्या उत्पादनांच्या सर्वात मोठ्या निवडीसह ग्राहक स्मार्टफोन्स, इलेक्ट्रॉनिक्स, फॅशन, ब्युटी, होम आणि किचन, रोजच्या गरजांच्या वस्तू आणि इतर गोष्टींवर बचत अनलॉक करू शकतात. ग्राहकांना एसबीआय क्रेडिट आणि डेबिट कार्ड्स आणि ईएमआय व्यवहारांवर 10% तात्काळ सूट मिळते. प्राइम मेंबर्सना ॲमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्हल 2026 दरम्यान खरेदी करताना 10% पर्यंत अतिरिक्त फायदे मिळतात.

बजाज फायनान्सतर्फे मुदतठेव दरांमध्ये वाढ

मुंबई : भारतातील सर्वात मोठी खाजगी क्षेत्रातील नॉन-बँकिंग वित्तीय कंपनी बजाज फायनान्स लिमिटेडने आज त्यांच्या मुदतठेवींवरील व्याजदरांमध्ये १२ ते ६० महिन्यांच्या सर्व मुदतींसाठी १५ ते ४० बेसिस पॉईंट्सची वाढ केली आहे. सुधारित दर आजपासून लागू झाले असून ते नवीन ठेवी आणि नूतनीकरण या दोन्हीसाठी लागू आहेत. दीर्घ मुदतींवर सर्वात मोठी वाढ करण्यात आली आहे. ३१ ते ६० महिन्यांच्या कालावधीसाठीचे दर नियमित ठेवीदारांसाठी ३५ बेसिस पॉईंट्स आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ४० बेसिस पॉईंट्सने वाढले आहेत.नवीन ठेवी बुक करणारे नियमित ठेवीदार आता ३१ ते ६० महिन्यांसाठी एकत्रित वार्षिक ७.७५ टक्के पर्यंत व्याज मिळवू शकतात, जे पूर्वी वार्षिक ७.४० टक्के होते. १२ ते १७ महिन्यांच्या मुदतीचे दर वार्षिक ६.६० टक्के वरून वाढून ६.८० टक्के झाले आहेत आणि १८ ते ३० महिन्यांच्या मुदतीचे दर वार्षिक ६.८५ टक्क्यांवरून ७.०० टक्के झाले आहेत.



महिला शेतकरी आत्महत्या करत आहेत, ही महाराष्ट्रासाठी धोक्याची घंटा : वडेट्टीवार

सहा तास लोडशेडिंगने हिंगोली हैराण,सत्ताधारी लोकप्रतिनिधी कुठे? वडेट्टीवार यांचा सवाल

हिंगोली : महाराष्ट्र १९७२ नंतरच्या सर्वात भीषण दुष्काळी संकटाला सामोरे जात असून, मराठवाड्यातील परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे. तलावांमध्ये पाणी नाही, विहिरी कोरड्या पडल्या आहेत, पिण्याच्या पाण्याचे संकट उभे राहणार आहे. अशा परिस्थितीत सरकारने केवळ जीआर काढून शेतकऱ्यांची फसवणूक न करता तातडीने हेक्टरी एक लाख रुपयांची मदत जाहीर करावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

हिंगोली जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना पत्रकार परिषदेत बोलताना वडेट्टीवार म्हणाले की, १९७२ च्या दुष्काळात सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहून मदत केली होती. आजचा कोरडा दुष्काळ त्याहून गंभीर आहे. अल निनोचा परिणाम होणार असल्याची माहिती सरकारला आधीपासून होती. तरीही आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या नाहीत. सरकारने शेतकरी संकटाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे.

दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आपण शेतकऱ्यांच्या बांधावर जात असून, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांचीही भेट घेत असल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले. हिंगोलीत मागील २० दिवसांत हिंगोली सहा शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्यात महिला शेतकऱ्याचा समावेश आहे ही धोक्याची घंटा आहे. शेतकऱ्याला सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे आत्महत्येची वेळ येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा करण्यात आली, मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळालेली नाही. कर्जपुनर्गठन हा कायमस्वरूपी उपाय नसून पुढील काळात शेतकऱ्याला ते कर्ज फेडावेच लागणार आहे. त्यामुळे कर्जपुनर्गठन न करता सरसकट ७/१२ कोरा करून शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावे, अशी मागणी त्यांनी केली.



दुष्काळी संकटातून शेतकऱ्यांना बाहेर काढायचे असेल तर सरकारने अनावश्यक मोठे प्रकल्प आणि खर्च थांबवून शेतकऱ्यांसाठी निधी उपलब्ध करून द्यावा. शक्तिपीठ महामार्ग रद्द करा आणि त्यासाठीचा पैसा शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वापरा. कुंभमेळ्यापेक्षा शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे महत्त्वाचे आहे, असा घणाघात वडेट्टीवार यांनी केला.

शेतकऱ्यांनीही शक्तिपीठ महामार्ग रद्द करा अशी मागणी करत वडेट्टीवार यांना चटणी-भाकरी दिली. मंत्र्यांना काजू-बदाम दिले जातात.पण वडेट्टीवार यांनी शेतकऱ्यांनी दिलेली भाकरी स्वीकारली आणि शक्तिपीठ महामार्गाविरोधात सभागृहात आवाज उठवू तसेच रस्त्यावरही आंदोलन उभे करू, असा निर्धार व्यक्त केला.

शक्तिपीठ महामार्गासाठी शेतकऱ्यांना शेतात जाऊ न देता मोजणी सुरू असल्याचा आरोप करत वडेट्टीवार यांनी सरकारच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. शेतकऱ्यांच्या इच्छेविरुद्ध जमीन घेण्याचा प्रयत्न सहन केला जाणार नाही. शक्तिपीठविरोधात शेतकऱ्यांच्या मागणीला काँग्रेसचा पूर्ण पाठिंबा आहे, असे ते म्हणाले.

शेतकऱ्यांचे कर्ज माफ करताना सरकारच्या हाताला लकवा मारतो का? उद्योगपतींची कर्जे माफ होतात, मग कष्टकरी शेतकऱ्याला कर्जमाफी का नाही? शेतकरी जगला तरच देशाची आणि महाराष्ट्राची अर्थव्यवस्था मजबूत राहील, असे वडेट्टीवार यांनी सुनावले.

हिंगोली जिल्ह्यात तब्बल सहा तास लोडशेडिंग सुरू असल्याचा मुद्दाही वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. हिंगोलीत सहा आमदार आणि दोन खासदार सत्ताधारी पक्षाचे आहेत. मग जनतेच्या प्रश्नांसाठी हे लोकप्रतिनिधी काय करत आहेत? हिंगोलीला वाली कोण? जनतेने एकदा या लोकप्रतिनिधींना जाब विचारला पाहिजे,असे ते म्हणाले.

हिंगोलीमध्ये घडलेल्या स्फोटाच्या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाला असून जखमींच्या कुटुंबीयांचीही वडेट्टीवार यांनी भेट घेतली. या दुःखद घटनेबद्दल त्यांनी संवेदना व्यक्त करत पीडित कुटुंबांना आवश्यक मदत मिळावी, अशी मागणी केली.

यावेळी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा यवतमाळ जिल्हाध्यक्ष एडवोकेट सचिन नाईक काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष हिंगोली सतीश पाचपुते माजी जिल्हाध्यक्ष सुरेश आप्पा सराफ प्रदेश सचिव साहेबराव देवकते ज्येष्ठ नेते सुधीरआप्पा सराफ ओबीसी जिल्हाध्यक्ष भास्कर पोले नाईक जक्की कुरेशी

हिंगोली शहराध्यक्ष मिलिंद उबाळे युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव बंटी नागरे जक्की कुरेशी डॉ रमेश शिंदे माजी जिल्हा परिषद सदस्य शामराव जगताप अल्पसंख्याक मराठवाडा अध्यक्ष अब्दुल हाफिज औंढा नागनाथ तालुकाध्यक्ष प्रदीपराव पोले नाईक वसमत तालुकाध्यक्ष ऋषिकेश देशमुख जिल्हा सरचिटणीस किशन जुमडे विठ्ठल मोहनकर दत्ता भवर विशाल इंगोले यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

अनाथांचा नाथ... मदतीचा हात! : 'सेवा संकल्प अभियानाची' सुरुवात परभणीतून

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी : पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या मुख्यमंत्रीपदापासून पंतप्रधानपदापर्यंतच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या सेवापूर्तीचे औचित्य साधून, 'सेवा संकल्प अभियानाची' सुरुवात परभणीतून करण्याचा मान शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा. एकनाथरावजी शिंदे साहेब यांनी परभणीला दिला.

परभणीसह संपूर्ण मराठवाडा दुष्काळाच्या संकटाला सामोरा जात असताना, केवळ आश्वासने न देता दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी प्रत्यक्ष कृती करण्याचा निर्णय शिवसेनेच्या वतीने घेण्यात आला. याच भावनेतून आज दुष्काळग्रस्त व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शिलाई मशीन, गरजू मुलींना सायकली वाटप करण्यात आले. प्रातिनिधिक स्वरूपात कार्यक्रम ठिकाणी याची सुरुवात केली, याचबरोबर २५ रुग्णवाहिकांचे लोकार्पण आज परभणीच्या भूमीतून करण्यात आले. या रुग्णवाहिका मराठवाड्यातील गरजू रुग्णांच्या



सेवेसाठी उपलब्ध होणार आहेत.

'८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण' हा शिवसेनेचा विचार आहे. याच भावनेतून संकटाच्या काळात जनतेच्या मदतीला धावून जाण्याचे काम शिवसेनेने कायम केले आहे.

आजच्या कार्यक्रमात मी एकनाथ शिंदे साहेबांकडे परभणीच्या विकासाच्या दृष्टीने काही महत्त्वाच्या मागण्या मांडल्या. परभणी हा कायम दुष्काळाचा सामना करणारा जिल्हा आहे. त्यामुळे परभणीत मोठा उद्योग आणून पाच-दहा हजार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, नाट्यगृहासाठी निधी द्यावा, महानगरपालिकेच्या रखडलेल्या निधीचा प्रश्न मार्गी लावावा तसेच मानवत तालुक्यातील पाण्यापासून वंचित ६५ गावांसाठी जायकवाडीचे पाणी एअरलिफ्ट करून कायमस्वरूपी पाणीप्रश्न सोडवावा, अशी मागणी केली. परभणीच्या विकासासाठी यापूर्वीही शिंदे साहेबांनी १२० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. आज त्यांनी परभणीच्या विविध प्रश्नांबाबत सकारात्मक प्रतिसाद देत सर्व प्रश्न मार्गी लावण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

उद्योगधंदे उभारण्यासाठी मागील महिन्यातच उद्योगमंत्री मा.उदय सामंत यांना सूचना केल्याचेही त्यांनी सांगितले. सरकारी तिजोरी ही शेतकऱ्यांची आहे आणि शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही, हा शब्द आज एकनाथ शिंदे साहेबांनी दिला. दुष्काळ आणि आत्महत्येमुळे संकटात सापडलेल्या कुटुंबांतील महिला व तरुणींशी मा. एकनाथ शिंदे साहेबांनी आज स्वतः आपुलकीने संवाद साधत त्यांच्या अडचणी आणि समस्या जाणून घेतल्या. त्यांच्या परिस्थितीची आस्थेने विचारपूस करत "मी तुमच्या सोबत आहे, काळजी करू नका", असा विश्वास दिला. संकटाच्या काळात या कुटुंबांच्या पाठीशी शासन आणि शिवसेना ठामपणे उभी राहील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

परभणी जिल्ह्यातील हजारो शेतकरी व कष्टकरी, पदाधिकारी, कार्यकर्ते, माता-भगिनी आणि नागरिकांनी आज मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाला साथ दिली. सर्वांचे मनःपूर्वक आभार.

पंचायत समितीत सत्तेत असूनही विरोधी पक्षनेतेपदाचा दावा!

भुमरे-शिरसाट गटांत दालनावरुन जुंपली

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर - पंचायत समितीत भाजपसोबत शिंदे गट सत्तेत असतानाही शिंदे गटातीलच भुमरे आणि शिरसाट समर्थकांमध्ये वेगवेगळे गट असल्याचे चित्र बुधवारी झालेल्या मासिक सभेत पाहायला मिळाले. उपसभापती बाळासाहेब गाढे हे मंत्री संजय शिरसाट यांच्या गटाचे असल्याचे सांगत खासदार संदिपान भुमरे यांच्या गटाचे सदस्य अनुराग शिंदे यांनी विरोधी पक्षनेतेपदासह स्वतंत्र दालनाची मागणी केली. त्यामुळे सभेत काही काळ चांगलाच वाद रंगला. सभापती कल्याण गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (७ ऑक्टोबर) पंचायत समितीची मासिक सभा झाली. यावेळी अनुराग शिंदे यांनी विरोधी पक्षनेतेपद आणि स्वतंत्र दालनाची मागणी केली. मात्र, तुम्ही सत्तेत सहभागी असताना विरोधी पक्षनेतेपद कसे देता येईल, असा सवाल सभापती गायकवाड यांनी उपस्थित केला. तसेच पंचायत समितीत विरोधी पक्षनेतेपद हे संवैधानिक पद नसल्याने स्वतंत्र दालन देता येणार नसल्याची भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

या मुद्द्यावरून शिंदे गटातील भुमरे आणि शिरसाट समर्थकांमध्ये बराच वेळ खडाजंगी झाली. तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती, पाणी आणि इतर प्रश्नांवर चर्चा अपेक्षित असताना दालन आणि पदाच्या मागणीवरून सुरू झालेल्या वादात सभेचा काही वेळ गेला.

दरम्यान, सदस्यांनी तालुक्यातील विविध प्रश्न सभेत मांडले. एमजीएमकडून तलावाचे पाणी अवैधरित्या उपसले जात असल्याचा आरोप अनुराग शिंदे यांनी केला. तालुक्यात चारा छावण्या सुरू करण्याची मागणी सर्जेराव चव्हाण यांनी केली. तर शाळांमध्ये शिक्षक वेळेवर येत नाहीत तसेच ग्रामसेवक गावात उपस्थित राहत नसल्याचा मुद्दा शेखर दांडगे यांनी उपस्थित केला. एकीकडे तालुक्यात दुष्काळी परिस्थितीचे प्रश्न गंभीर असताना पंचायत समितीच्या सभेत सत्ताधारी गटातीलच दोन गटांमध्ये पद आणि दालनावरून वाद रंगल्याने राजकीय चर्चेला उधाण आले.

गरज भासल्यास संबंधित कंपन्या बंद करण्याची कारवाई करावी, गिरीश महाजनांचे निर्देश

नाशिक : अंबड औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांकडून प्रक्रिया न करता दूषित सांडपाणी सोडले जात असल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेत जलप्रदूषण करणाऱ्या कंपन्यांवर तातडीने कठोर कारवाई करावी. गरज भासल्यास संबंधित कंपन्या बंद करण्याची कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी दिले. अंबड औद्योगिक वसाहतीलगतच्या दत्तनगर, मारुती संकुल आणि तुळजाभवानी परिसरातील कुपनलिकांमधून पिवळ्या रंगाचे, उग्र वासाचे आणि रसायनमिश्रित पाणी येत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. काही कंपन्यांकडून प्रक्रिया न करता रासायनिक सांडपाणी जमिनीत सोडले जात असल्याचा आरोप आहे. हे दूषित पाणी जमिनीखालील जलस्रोतांद्वारे नंदिनी नदीत मिसळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या गंभीर प्रश्नाची दखल घेत पालकमंत्री गिरीश महाजन यांनी गुरुवारी दत्तनगर, मारुती संकुल आणि तुळजाभवानी परिसराला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. कुपनलिकांमधील दूषित पाण्याची पाहणी करत त्यांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधला. दूषित पाण्यामुळे काही नागरिकांना त्वचेच्या तक्रारी आणि इतर आरोग्यविषयक त्रास होत असल्याचे यावेळी त्यांच्या निदर्शनास आले. नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या संभाव्य परिणामांबाबत महाजन यांनी चिंता व्यक्त केली.नागरिकांच्या आरोग्याशी कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाणार नाही. निष्काळजीपणा करणाऱ्या उद्योगांना पाठीशी घातले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा गिरीश महाजन यांनी दिला.

शिवना बस स्टँड परिसर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी प्रशासनाची धडक मोहीम

अतिक्रमण हटाव कारवाईला सुरुवात; प्रवासी व वाहनधारकांना मिळणार दिलासा

अजिंठा प्रतिनिधी : सिल्लोड तालुक्यातील शिवना येथील बस स्टँड परिसरातील अतिक्रमण हटविण्यासाठी प्रशासनाने धडक मोहीम सुरू केली आहे. बस स्टँड परिसरात रस्त्याच्या कडेला तसेच सार्वजनिक जागेवर झालेल्या अतिक्रमणामुळे प्रवासी आणि वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यामुळे प्रशासनाच्या या कारवाईचे नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

शिवना बस स्टँड परिसरात काही ठिकाणी दुकाने, हातगाड्या, पत्र्याचे शेड तसेच विविध स्वरूपाचे अतिक्रमण झाल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता. बस ये-जा करताना तसेच प्रवाशांना बसमध्ये चढताना व उतरताना त्रास सहन करावा लागत होता. यामुळे परिसरात अनेकदा वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण होत होती.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने अतिक्रमण हटाव मोहिमेला सुरुवात केली असून



सार्वजनिक रस्ते व जागा मोकळी करण्याच्या दृष्टीने कारवाई करण्यात येत आहे. या मोहिमेमुळे बस स्टँड परिसर अधिक प्रशस्त होऊन प्रवासी व वाहनधारकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

दरम्यान, अतिक्रमण हटविल्यानंतर पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी प्रशासनाने नियमित पाहणी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. बस स्टँड परिसर कायमस्वरूपी अतिक्रमणमुक्त ठेवण्याची जबाबदारी प्रशासनाने घ्यावी, अशी अपेक्षाही नागरिकांनी व्यक्त केली आहे.

नाना पाटेकरांच्या निधनावर पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून भावपूर्ण श्रद्धांजली; अभूतपूर्व योगदानाचा केला गौरव

नवी दिल्ली : भारतीय चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ आणि दिग्गज अभिनेते नाना पाटेकर यांचे गुरुवारी पहाटे निधन झाले. त्यांच्या या अकस्मात जाण्याने संपूर्ण कलाविश्वावर शोककळा पसरली आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत, त्यांनी कला क्षेत्रात आणि समाजात निर्माण केलेल्या अतुलनीय प्रभावाचे स्मरण केले. यशस्वी करिअर आणि निडर अभिनयाचे कौतुक करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, नाना पाटेकर हे एक अत्यंत विलक्षण आणि असाधारण कलाकार होते. त्यांनी साकारलेल्या विविध प्रकारच्या भूमिकांनी देश-विदेशातील करोडो प्रेक्षकांची मने जिंकली. यशोभूमी येथे आयोजित 'इंडिया मोबाईल काँग्रेस'च्या १० व्या आवृत्तीदरम्यान बोलताना पंतप्रधानांनी नानांच्या आठवणींना उजाळा दिला आणि संपूर्ण जीवन चित्रपटसृष्टीला समर्पित करणाऱ्या या कलाकाराचे कौतुक केले.

नाना पाटेकर यांच्या अभिनयशैलीवर आणि दृष्टिकोनावर प्रकाश टाकताना पंतप्रधान मोदी म्हणाले, "नाना पाटेकर यांनी कधीही स्वतःला एका विशिष्ट चौकटीत किंवा भूमिकेत बांधून ठेवले नाही. जसे एखादे पाखरू आकाशात मुक्तपणे उडते, तसेच नानांनी संपूर्ण चित्रपटसृष्टीत स्वतःच्या अष्टपैलू अभिनयाने मोकळा संचार केला. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सिनेमा या कलेच्या समृद्धीसाठी अर्पण केले."



केवळ मनोरंजन क्षेत्रापुरते मर्यादित न राहता, त्यांनी आपल्या कामातून सामाजिक भान कसे जपले, याबद्दल बोलताना पंतप्रधान म्हणाले, "नाना पाटेकर यांनी आपल्या चित्रपटांच्या माध्यमातून समाजात पसरलेल्या अन्यायावर आणि त्रुटींवर अत्यंत आक्रमकपणे प्रहार केला. ते आपल्याच परीने एक विचारवंत आणि क्रांतीकारी कलाकार होते, ज्यांनी सामाजिक वाईट गोष्टींविरुद्ध नेहमी आवाज उठवला. त्यांचे बोलके शब्द जितके शक्तिशाली होते, तितकाच त्यांचा शांत राहण्याचा अंदाजही प्रभावी होता. राष्ट्रविरोधी विचारांविरोधात ठाम भूमिका घेण्यासाठी ते नेहमीच अग्रेसर राहिले." आपल्या भावना व्यक्त करताना पंतप्रधानांनी शेवटी सांगितले, "मी अभिनेते नाना पाटेकरजी यांना मनापासून श्रद्धांजली वाहतो. या कठीण प्रसंगी मी त्यांचे कुटुंबीय, जवळचे मित्र आणि त्यांच्या देशभरातील अथांग चाहत्यांच्या दुःखात सहभागी असून माझ्या संवेदना व्यक्त करतो."

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे गुरुवारी पहाटे ५:२० वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मनिपाल हॉस्पिटलच्या ऑन्कोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. शेखर साळकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, नानांना राहत्या घरी हृदयविकाराचा झटका आला होता. त्यानंतर त्यांना वाचवण्यासाठी तब्बल ४५ मिनिटे सीपीआर (CPR) देण्यात आला, मात्र त्यांच्या शरीरातून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. वैद्यकीय आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाली असून नियमानुसार शवविच्छेदन केले जाणार असल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले.नाना पाटेकर हे हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतील सर्वात प्रतिष्ठित आणि मान सन्मान मिळालेल्या कलाकारांपैकी एक होते.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

आघाडीतील 'मैत्रीपूर्ण' तणाव आणि समन्वयाची परीक्षा

विधान परिषदेच्या पाच जागा एकत्रितपणे लढवण्याचा निर्धार व्यक्त केल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच महाविकास आघाडीतील घटकपक्षांमधील मतभेद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहेत. अमरावती शिक्षक आणि मराठवाडा पदवीधर या दोन अत्यंत महत्त्वाच्या मतदारसंघांत आघाडीतील घटकपक्षांनी एकमेकांविरोधात उमेदवार उभे केल्याने 'मैत्रीपूर्ण लढती'ची नामुष्की ओढवण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. अमरावतीत काँग्रेस आणि शिवसेना (उबाठा), तर मराठवाड्यात शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आमनेसामने आल्याने मविआच्या वरिष्ठ नेतृत्वातील समन्वयाचा अभाव स्पष्टपणे दिसून येत आहे. ९ ऑक्टोबर ही अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत असल्याने या जागांचा तिढा सोडवण्यासाठी नेत्यांकडे अवघे काही तास शिल्लक आहेत. मराठवाडा पदवीधर मतदारसंघ हा ऐतिहासिकदृष्ट्या राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला राहिला असल्याचे सांगत शरद पवार गटाने डॉ. प्रतापसिंह पाटील यांची उमेदवारी जाहीर केली, तर दुसरीकडे शिवसेना (उबाठा) पक्षाने दिलीप घुगे यांना रिंगणात उतरवून आपला दावा ताणून धरला आहे. संजय राऊत यांनी मराठवाड्याच्या जागेवरील शरद पवार गटाचा दावा फेटाळून लावल्याने दोन्ही पक्षांतील तणाव अधिकच वाढला आहे. तसेच, अमरावती शिक्षक मतदारसंघात काँग्रेसने अदिती पोहरे यांना उमेदवारी दिल्यानंतरही ठाकरे गटाने दत्तात्रय लहाने यांचा अर्ज दाखल करून आघाडीतील अंतर्विरोध उघडा पाडला आहे. पाचही जागांवर एकत्र लढण्याची घोषणा वरिष्ठ स्तरावर झाल्यानंतरही, प्रत्यक्ष मैदानात स्थानिक पातळीवर परस्परविरोधी अर्ज दाखल होणे हे मविआच्या जागावाटपाच्या धोरणातील गोंधळ दर्शवते. 'आघाडीत कोणतीही नाराजी नसून चर्चेतून मार्ग निघेल,' असा विश्वास सुप्रिया सुळे व्यक्त करत असल्या, तरी प्रत्यक्ष रणनीतीत मात्र एकवाक्यता दिसत नाही. ९ ऑक्टोबरच्या मुदतीपूर्वी जर हे अर्ज मागे घेतले गेले नाहीत, तर महायुतीविरोधातील लढाईत आघाडीची मते फुटून त्याचा थेट फायदा विरोधी पक्षाला मिळण्याचा धोका आहे. पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील निवडणुका या सुशिक्षित आणि प्रगल्भ मतदारांच्या असतात; अशा वेळी आघाडीतील उघड भांडणे आणि ऐक्याचा अभाव मतदारांमध्ये चुकीचा संदेश देणारा ठरेल. ९ ऑक्टोबरची वेळ संपण्यापूर्वी आघाडीचे वरिष्ठ नेते आपापले वैयक्तिक आणि पक्षीय हट्ट बाजूला ठेवून समन्वयाचा मार्ग काढतात की ही 'मैत्रीपूर्ण' लढत आघाडीच्या ऐक्याला तडा घालते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

हळदीवरील कंदमाशीचा वाढता प्रादुर्भाव, करपा-कंदकुज व अन्नद्रव्यांच्या कमतरतेचे व्यवस्थापन करा!

वनामकृविच्या तज्ज्ञांनी सुचविल्या उपाययोजना

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**सध्या हळद पिकामध्ये अनेक ठिकाणी कंदमाशीचा वाढता प्रादुर्भाव तसेच करपा, पानांवरील ठिपके, कंदकुज आणि पालाश व सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता दिसून येत आहे. काही वेळा अन्नद्रव्यांच्या कमतरतेची लक्षणे करपा रोगासारखी दिसून येतात. त्यामुळे लक्षणांची योग्य ओळख करून वेळेवर व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. त्यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे डॉ. गजानन गडदे, डॉ. दिगंबर पटाईत आणि श्री. मधुकर मांडगे या तज्ज्ञांनी पुढीलप्रमाणे उपाययोजना सुचविल्या आहेत.

कंदमाशीचे व्यवस्थापन

कंदमाशीचा प्रादुर्भाव जास्त असल्यास क्विनॉलफॉस २५% – २० मिली किंवा डायमेथोएट ३०% – १५ मिली प्रति १० लिटर पाणी यापैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी. आवश्यकता असल्यास १५ दिवसांनी दुसऱ्या गटातील कीटकनाशकाची फवारणी करावी. फवारणी करताना चांगल्या प्रतीचे स्टिकर वापरावे.

कंद उघडे पडले असल्यास त्यावर मातीची भर देऊन वेळेवर भर लावावी. त्यामुळे कंदमाशीला कंदावर अंडी घालण्यास प्रतिबंध होण्यास मदत होते.

शेत तणमुक्त व स्वच्छ ठेवावे. प्रादुर्भावग्रस्त व कुजलेले कंद शेतात पडून राहू देऊ नयेत.

कंदमाशीचा प्रादुर्भाव असलेल्या ठिकाणी क्लोरपायरीफॉस ५०% – ५० मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात द्रावण तयार करून झाडांच्या बुंध्याभोवती आळवणी करावी.

एकरी २ ते ३ पसरट तोंडाची भांडी ठेवून प्रत्येक भांड्यात २०० ग्रॅम भरडलेले एरंडीचे बी व १ ते १.५ लिटर पाणी घ्यावे. ८ ते १० दिवसांनी तयार होणाऱ्या विशिष्ट वासाकडे कंदमाशीचे प्रौढ आकर्षित होऊन त्यात पडून मरतात.

करपा व पानांवरील रोगांचे व्यवस्थापन

रोगट पाने गोळा करून शेताबाहेर नष्ट करावीत. शेतात रोगट अवशेष ठेवू नयेत व शेताची स्वच्छता राखावी.

प्रादुर्भाव कमी असल्यास कार्बेन्डाझिम ५०% – ४०० ग्रॅम किंवा मॅन्कोझेब ७५% – ५०० ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५०% – ५०० ग्रॅम प्रति एकर यापैकी कोणत्याही एका बुरशीनाशकाची फवारणी करावी.

प्रादुर्भाव जास्त असल्यास अॅझॉक्सीस्ट्रोबिन १८.२% + डिफेनोकोनॅझोल ११.४% – २०० मिली किंवा प्रोपिकोनॅझोल २५% – २०० मिली किंवा क्लोरोथॅलोनील ७५% – ५०० ग्रॅम प्रति एकर यापैकी योग्य बुरशीनाशकाची फवारणी करावी.

कंदकुज रोगाचे व्यवस्थापन

ट्रायकोडर्मा २ ते २.५ किलो प्रति एकर चांगल्या कुजलेल्या शेणखतात मिसळून जमिनीत द्यावे.

शेतात पाणी साचणार नाही


कंदमाशी प्रौढ

कंदमाशी अळी प्रादुर्भाव

कंदमाशीमुळे झालेली कुज

कंदकुज

अन्नद्रव्य कमतरता

पालाशची कमतरता तसेच सध्य अवतलाची कमतरता

– ५०० ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५०% – ५०० ग्रॅम प्रति एकर यापैकी कोणत्याही एका बुरशीनाशकाची फवारणी करावी.

प्रादुर्भाव जास्त असल्यास अॅझॉक्सीस्ट्रोबिन १८.२% + डिफेनोकोनॅझोल ११.४% – २०० मिली किंवा प्रोपिकोनॅझोल २५% – २०० मिली किंवा क्लोरोथॅलोनील ७५% – ५०० ग्रॅम प्रति एकर यापैकी योग्य बुरशीनाशकाची फवारणी करावी.

कंदकुज रोगाचे व्यवस्थापन

ट्रायकोडर्मा २ ते २.५ किलो प्रति एकर चांगल्या कुजलेल्या शेणखतात मिसळून जमिनीत द्यावे.

शेतात पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी व अतिरिक्त पाण्याचा त्वरित निचरा करावा.

कंदकुज आढळल्यास मॅन्कोझेब ७५% – ३ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५०% – ५ ग्रॅम प्रति लिटर पाणी यापैकी योग्य बुरशीनाशकाचे द्रावण तयार करून बाधित झाडांच्या बुंध्याभोवती ड्रेंचिंग करावे.

पालाश व सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता

सध्या अनेक ठिकाणी हळद पिकामध्ये पालाश व सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता दिसून येत आहे. पालाशाच्या कमतरतेमध्ये जुन्या पानांच्या कडा पिवळसर होऊन नंतर तपकिरी व करपल्यासारख्या दिसतात. त्यामुळे अशा लक्षणांना केवळ करपा समजून बुरशीनाशकाची फवारणी करू नये.

विद्यापीठाने केलेल्या शिफारसीनुसार खतांचा योग्य डोस द्यावा.

पालाशाची कमतरता दिसून आल्यास सल्फेट ऑफ पोटॅश (०:०:५०) – १० ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

ग्रेड-II सूक्ष्म अन्नद्रव्ये – घन स्वरूपासाठी ५ ग्रॅम किंवा द्रवरूपासाठी ५ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात वापरावे.

आवश्यकता असल्यास आणि पिकाची अवस्था विचारात घेऊन ८ ते १० दिवसांच्या अंतराने फवारणी पुन्हा एकदा करावी.

फवारणी करताना घ्यावयाची काळजी

फवारणीपूर्वी औषधाच्या बाटलीवरील लेबल, वापराचे प्रमाण व पिकासाठी दिलेल्या शिफारसी काळजीपूर्वक तपासाव्यात.

सध्या कडक ऊन असल्याने भर उन्हात फवारणी करू नये. फवारणी सकाळी ऊन सुरू होण्यापूर्वी किंवा दुपारी ऊन कमी झाल्यानंतर करावी.

फवारणीकरिता शिफारस केलेले पाण्याचे प्रमाणच वापरावे. अत्यंत कमी पाण्यात फवारणी केल्यास औषधाचा पिकावर योग्य व समान थर बसत नाही आणि अपेक्षित परिणाम मिळत नाही.

कीटकनाशक, बुरशीनाशक, विद्राव्य खते व सूक्ष्म अन्नद्रव्ये अनावश्यकपणे एकाच फवारणीत मिसळू नयेत.

एकाच कीटकनाशकाची किंवा बुरशीनाशकाची वारंवार फवारणी करू नये. चांगल्या प्रतीचे व पिकासाठी योग्य स्टिकर वापरावे.

फवारणी करताना अंग झाकणारे कपडे, रबरी हातमोजे, रबरी बूट, संरक्षक चष्मा व मास्क/श्वसन संरक्षक साधनांचा वापर करावा.

औषधांची फवारणी करताना धूम्रपान, तंबाखू किंवा खाद्यपदार्थांचे सेवन करू नये. फवारणीनंतर हात, चेहरा व वापरलेली साधने साबणाने स्वच्छ धुवावीत.

अधिक माहितीसाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राच्या दूरध्वनी क्रमांक ०२४५२-२२९००० किंवा व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक ८३२९४३२०९७ यावर संपर्क साधावा. (कार्यालयीन वेळेत, सुट्टीचे दिवस वगळून.)

नाना पाटेकर यांच्या निधनाने संवेदनशील माणूस आणि सामाजिक बांधिलकीचा आवाज हरपला

'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून शेतकरी, गरजू कुटुंबांसाठी केलेले कार्य सदैव स्मरणात राहील : अंकुशराव कदम

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : ज्येष्ठ अभिनेते पद्मश्री नाना पाटेकर यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीसह महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्राचे मोठे नुकसान झाले आहे. उत्तुंग कलावंत म्हणून त्यांनी आपली अमीट छाप सोडली; मात्र त्यांच्यातील संवेदनशील माणूस, शेतकऱ्यांच्या वेदना जाणणारा समाजभान असलेला कार्यकर्ता आणि गरजूंच्या मदतीसाठी धावून जाणारा आधारवड म्हणून त्यांचे कार्य अधिक मोठे आहे, अशा शब्दांत एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

दुष्काळ आणि शेतकरी आत्महत्यांच्या काळात नाना पाटेकर यांनी सामाजिक बांधिलकी जपत स्वतःला समाजकार्यात झोकून दिले. मकरंद अनासपुरे यांच्या साथीने स्थापन केलेल्या 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून त्यांनी दुष्काळग्रस्त तसेच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदतीचा हात दिला. जलसंधारणाच्या माध्यमातून नद्यांचे खोलीकरण, तलावांतील गाळ काढणे आणि जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करून अनेक गावे पाणीदार करण्याचे काम त्यांनी केले.



आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना केवळ आर्थिक मदत न करता त्यांना स्वावलंबी करण्यावरही त्यांनी भर दिला. विधवांना शिलाई मशीन, शेळीपालन आदी माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या.

नाना पाटेकर यांचे एमजीएम परिवाराशीही अत्यंत जिव्हाळ्याचे नाते होते. एमजीएम रुग्णालयाशी त्यांचे विशेष आत्मीय संबंध होते. आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या शेतकरी कुटुंबांना शिक्षण आणि आरोग्याच्या माध्यमातून आधार मिळावा, या उद्देशाने एमजीएम विद्यापीठ आणि 'नाम फाउंडेशन' यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला होता. या माध्यमातून शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांतील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण तसेच कुटुंबीयांना मोफत वैद्यकीय उपचार देण्याची व्यवस्था करण्यात आली.

काही महिन्यांपूर्वी नाना पाटेकर यांनी एमजीएमला सदिच्छा भेट दिली होती. त्या भेटीत त्यांचा साधेपणा, स्पष्टवक्तेपणा, उत्साह आणि माणसांशी असलेला जिव्हाळा पुन्हा प्रकर्षाने जाणवला. शेतकरी, विद्यार्थी, कलाकार आणि तळागाळातील माणसाप्रती त्यांनी जपलेली बांधिलकी त्यांच्या कार्यातून कायम स्मरणात राहील.

नाना पाटेकर यांच्या निधनाने सामाजिक जाणीव असलेला संवेदनशील आवाज हरपला आहे. त्यांच्या कुटुंबीय, सहकारी आणि असंख्य चाहत्यांच्या दुःखात एमजीएम परिवार सहभागी असून, त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली, असे एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांनी म्हटले आहे.

मालमत्ता कर थकबाकीदारांवर मनपाची धडक कारवाई


हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : मालमत्ता कराची मोठी थकबाकी असलेल्या मालमत्ताधारकांविरोधात महानगरपालिकेने गुरुवारी धडक कारवाई केली. मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार शहरातील विविध झोन कार्यालयांनी जप्तीची कारवाई करत दिवसभरात १२ मालमत्ता सील केल्या. या कारवाईत एकूण सुमारे ५४.३७ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल करण्यात आला.

अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे आणि उपआयुक्त (कर निर्धारक व संकलक) विकास नवाळे यांच्या सूचनेनुसार ही कारवाई करण्यात आली. झोन १ मध्ये तीन मालमत्ताधारकांकडून २०.७२ लाख रुपये, झोन ३ मध्ये दोन मालमत्ताधारकांकडून १.०६ लाख रुपये, झोन ५ मध्ये एका मालमत्ताधारकाकडून ५० हजार रुपये, झोन ६ मध्ये दोन मालमत्ताधारकांकडून १.५० लाख रुपये, झोन ७ मध्ये एका मालमत्ताधारकाकडून २.३९ लाख रुपये, झोन ८ मध्ये दोन मालमत्ताधारकांकडून ४.०१ लाख रुपये, तर झोन ९ मध्ये एका मालमत्ताधारकाकडून १.१९ लाख रुपये वसूल करण्यात आले.

दरम्यान, झोन २ मधील दोन, झोन ४ मधील तीन, झोन ५ मधील तीन, झोन ६ मधील एक, झोन ७ मधील एक आणि झोन १० मधील दोन अशा मालमत्ता सील करण्यात आल्या.

दर गुरुवारी-शुक्रवारी कारवाई

मोठ्या थकबाकीदारांविरोधातील ही कारवाई यापुढेही सुरू राहणार असून, दर गुरुवार आणि शुक्रवारी थकबाकीदार मालमत्तांवर जप्तीची कारवाई केली जाणार आहे. निवासी थकबाकीदारांच्या मालमत्तेतील एक खोली तसेच इतर स्थावर-जंगम मालमत्ताही सील करण्यात येतील, असा इशारा आयुक्त अमोल येडगे यांनी दिला आहे. मालमत्ताधारकांनी तातडीने थकीत कर भरून अप्रिय कारवाई टाळावी, असे आवाहनही त्यांनी केले.

अभिजात मराठीसाठी बोलीभाषांचे जतन, संवर्धन गरजेचे : डॉ. सर्जेराव जिगे

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : मराठी भाषेला मिळालेला अभिजात दर्जा हा मराठी मनाचा, मराठी मातीचा, मराठी संस्कृतीचा आणि मराठी साहित्यविश्वाचा अभिमान आहे. मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, जतन आणि संवर्धनासाठी विविध बोलीभाषांचे जतन होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे यांनी केले.

विवेकानंद महाविद्यालयात बुधवारी (७) अभिजात मराठी सप्ताहानिमित्त आयोजित 'अभिजात मराठी, अभिमान मराठी' या कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. प्राचार्य डॉ. निशिकांत आलटे आणि प्रा. अंकुश सोनुने यांची प्रमुख उपस्थिती होती.



डॉ. जिगे म्हणाले, हाल राजाने लिहिलेली 'गाथा सप्तशती', मुकुंदराजांचा 'विवेकसिंधू', 'लीळाचरित्र', 'ज्ञानेश्वरी' आणि 'तुकाराम गाथा' हे मराठी सारस्वताचे वैभव आहे. संत नामदेव हे पहिले प्रवासवर्णनकार संत असून, 'ज्ञानेश्वरी'मध्ये विविध बोलीभाषांचा समावेश आढळतो. मराठीला ज्ञानभाषेचा दर्जा अधिक बळकट करायचा असेल तर विविध विद्याशाखांचे पाठ्यक्रम मराठी भाषेतून तयार होणे आवश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. निशिकांत आलटे यांनी 'मराठी भाषेची प्राचीनता व सद्यस्थिती' या विषयावर भाष्य केले. प्रास्ताविकात प्रा. डॉ. दत्तात्रय डुंबरे यांनी मराठी विभागातर्फे वाचनाची आवड असलेल्या विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके देण्यात येणार असल्याची माहिती दिली. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी मराठी विभागात नाव नोंदवावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विठोबा मस्के यांनी केले. प्रा. अंकुश सोनुने यांनी आभार मानले. डॉ. एस. एम. मारकळ, डॉ. शैला जगदंबे, डॉ. ज्योती चव्हाण आणि मारुती खरात यांची विशेष उपस्थिती होती.

दुष्काळग्रस्त महाराष्ट्राची केंद्रीय पथकांकडून पाहणी सुरु; 11 सदस्यांचे पथक राज्यात दाखल

मुंबई : खरीप हंगामातील दुष्काळ आणि पिकांच्या नुकसानीची वस्तुनिष्ठ पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे ११ सदस्यांचे आंतरमंत्रालयीन पथक महाराष्ट्रात दाखल झाले असून, गुरुवारपासून प्रत्यक्ष क्षेत्रभेटींना सुरुवात झाली आहे. दुष्काळग्रस्त भागातील पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि अन्य परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेऊन त्याचे मूल्यांकन पथकाकडून करण्यात येणार आहे.

कृषी, जलसंपदा, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, अन्न व सार्वजनिक वितरण, पशुसंवर्धन, अर्थ विभाग, नीती आयोग यांसह संबंधित विभागांतील अधिकाऱ्यांचा पथकात समावेश आहे. कृषी व शेतकरी कल्याण विभागातील पीक विमा विषयाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल हे पथकाचे नेतृत्व करीत आहेत. क्षेत्रभेटीसाठी केंद्रीय पथकाचे तीन गट करण्यात आले आहेत. पहिल्या पथकाकडून अहिल्यानगर, सोलापूर आणि पुणे जिल्ह्यांतील दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली जाणार आहे. दुसरे पथक छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांत जाऊन पिकांचे नुकसान आणि पाणीटंचाईचा आढावा घेणार आहे. तिसरे पथक नागपूर, यवतमाळ तसेच लगतच्या टंचाईग्रस्त भागांची पाहणी करणार आहे.

प्रत्यक्ष क्षेत्रभेटीदरम्यान दुष्काळाची तीव्रता, पिकांचे झालेले नुकसान आणि पाणीटंचाईची स्थिती याबाबत संबंधित जिल्हा प्रशासनाकडून माहिती घेण्यात येणार आहे. केंद्र आणि राज्य यंत्रणांमध्ये समन्वय साधून ही पाहणी केली जाणार आहे. जिल्हानिहाय अंतिम कार्यक्रम निश्चित झाल्यानंतर पथकाच्या क्षेत्रभेटींचे नियोजन करण्यात येणार आहे.

प्रत्यक्ष पाहणीतील निष्कर्षांमुळे राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे क्षेत्रीय वास्तव केंद्र सरकारसमोर अधिक ठळकपणे मांडण्यास मदत होणार आहे.

कचनेर तांड्यावर गांजाची शेती उद्ध्वस्त; 182 किलो गांजा जप्त


हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : कचनेर तांडा क्रमांक ५ येथील शेतगट क्रमांक १३९ आणि १४१ मध्ये बेकायदेशीररीत्या गांजाची लागवड करण्यात आल्याची माहिती मिळाल्यानंतर चिकलठाणा पोलिसांनी गुरुवारी पहाटे धडक कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी तब्बल २४१ गांजाची झाडे जप्त केली असून त्यांचे एकूण वजन १८२.०२ किलो आहे. जप्त केलेल्या गांजाची बाजारभावानुसार किंमत सुमारे २७ लाख ३० हजार ३०० रुपये आहे. पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली चिकलठाणा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली तीन अधिकारी आणि १५ अंमलदारांच्या पथकाने ही कारवाई केली. गोपनीय माहितीच्या आधारे पथकाने कचनेर तांडा परिसरातील संबंधित शेतात छापा टाकून गांजाची लागवड केलेली झाडे ताब्यात घेतली. या प्रकरणी संबंधित शेतजमीनधारकांविरुद्ध अमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये (एनडीपीएस ॲक्ट) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त केलेल्या गांजाच्या लागवडीमागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, यासह या प्रकरणाचा पुढील तपास चिकलठाणा पोलीस करीत आहेत.

74 संघांच्या सहभागाने ढोरेगावात खो-खोचा थरार; मुलींमध्ये भैरुमल तनवाणी विद्या मंदिर; मुलांमध्ये यशवंतराव चव्हाण विद्यालय विजेते

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : ढोरेगाव येथे झालेल्या १४ वर्षांखालील तालुकास्तरीय शालेय खो-खो स्पर्धेत मुलींच्या गटात भैरुमल तनवाणी विद्या मंदिर, बजाजनगर, तर मुलांच्या गटात यशवंतराव चव्हाण विद्यालय, रांजणगाव शेणपुंजीने विजेतेपद पटकावले. गंगापूर तालुक्यातील जिल्हा परिषद आणि खासगी शाळांमधील तब्बल ७४ संघ सहभागी झाल्याने स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

क्रीडा व युवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर आणि जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, ढोरेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने ६ व ७ ऑक्टोबर रोजी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. दिवस-रात्र पद्धतीने झालेल्या सामन्यांत खेळाडूंनी चपळता, आक्रमकता, बचावकौशल्य आणि सांघिक समन्वयाचे दर्शन घडविले. ग्रामीण भागातील खेळाडूंनीही दमदार कामगिरी करत उपस्थितांची दाद मिळवली.

मुलींच्या गटात भैरुमल तनवाणी विद्या मंदिरने विजेतेपद, पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, माळीवाडगावने उपविजेतेपद मिळविले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पुरी आणि लोकनेते साहेबराव पाटील डोणगावकर विद्यालय, रांजणगाव पोळ यांनी तृतीय क्रमांक पटकावला.



मुलांच्या गटात यशवंतराव चव्हाण विद्यालयाने विजेतेपद, तर राष्ट्रमाता इंदिरा गांधी सैनिकी विद्यालय, रायपूरने उपविजेतेपद मिळविले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पुरी आणि शंकरराव पाटील विद्यालय, रांजणगाव शेणपुंजी यांना तृतीय क्रमांक मिळाला.

स्पर्धेचे उद्घाटन गंगापूरचे गटविकास अधिकारी सुहास वाघचौरे यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष खलील पटेल, तालुका क्रीडा आयोजक शफी शेख, शिक्षण विस्तार अधिकारी अनिलकुमार सकदेव, केंद्रप्रमुख सचिन डमाळे, केंद्रीय मुख्याध्यापक राजेश हिवाळे यांच्यासह क्रीडा शिक्षक, प्रशिक्षक आणि खेळाडू उपस्थित होते.

बक्षीस वितरण समारंभास गंगापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सलीम चाऊस, राष्ट्रीय प्रशिक्षक प्रमोद गुंड, शफी शेख, सचिन डमाळे, राजेश हिवाळे यांच्यासह क्रीडा शिक्षक व प्रशिक्षक उपस्थित होते. विजेत्या संघांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

जिल्हा क्रीडा अधिकारी मुकुंद वाडकर आणि तालुका क्रीडा अधिकारी राम मायंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा पार पडली. पंच म्हणून अजित तांबे, बाळासाहेब कोतकर, विलास निकम, सुनील थोरात, संदीप माघाडे, भाऊसाहेब गर्जे, अजित राजळे, आदिनाथ जगदाळे, अली बाकोदा, रामदास सारसर, अब्दुल बागेस, महेमूद पठाण यांच्यासह महिला पंचांनी काम पाहिले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी ढोरेगाव शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संमिश्र वार्ता

वनामकृविद्वारा रेणाखळी येथे जागतिक कापूस दिनानिमित्त शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रम

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**कापूस उत्पादक शेतकऱ्यांना कापूस उत्पादनापासून विक्रीपर्यंतच्या विविध बाबींविषयी मार्गदर्शन मिळावे तसेच गुलाबी बोंडअळी व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा प्रसार व्हावा, या उद्देशाने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत कापूस संशोधन योजना, परभणी यांच्या वतीने कापूस उत्पादकता मिशन (कापूस कांती), गुलाबी बोंडअळी व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रसार प्रकल्प आणि सेवा संकल्प अभियानांतर्गत जागतिक कापूस दिनानिमित्त ७ ऑक्टोबर २०२६ रोजी रेणाखळी (ता. पाथरी, जि. परभणी) येथे शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमास रेणाखळी गावाचे तंटामुक्ती अध्यक्ष श्री. मुक्तीराम हरकळ, कापूस संशोधन योजनेच्या प्रभारी अधिकारी तथा कापूस विद्यावेत्ता डॉ. मेघा प्रदीप जगताप, भारतीय कापूस महामंडळाचे (सीसीआय) वरिष्ठ वाणिज्य अधिकारी श्री. संजय एम. खोडके व श्री. उद्धव कोल्हे, तालुका कृषी अधिकारी श्री. गोविंद कोल्हे, एमसीपी-पीबीडब्ल्यू प्रकल्पाचे समन्वयक व कीटकशास्त्रज्ञ डॉ. दिगंबर पटाईत, उप कृषी अधिकारी श्री. गोपाल ढगे, आत्माचे तालुका तंत्र व्यवस्थापक श्री. विशाल दलाल, वरिष्ठ संशोधन सहाय्यक श्रीमती सारिका नारळे, कनिष्ठ संशोधन सहाय्यक श्री. आशिष अंभोरे, श्री. गजानन रोही, तुळजाई शेतकरी गटाचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम हरकळ तसेच महिला शेतकरी गटाच्या अध्यक्षा सौ. अनिता हरकळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी शेतकऱ्यांसोबत कापूस प्रक्षेत्राला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी कापूस लागवड, घन पद्धतीची कापूस लागवड, पिकाची वाढ, गुलाबी बोंडअळी व्यवस्थापन, कापूस वेचणी व गुणवत्तेबाबत शेतकऱ्यांशी चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांनी विविध विषयांवर प्रश्न उपस्थित करून तज्ज्ञांकडून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. कापसाची वेचणी लवकरात लवकर पूर्ण करून फरदड कापूस घेणे टाळावे, असा सल्ला तज्ज्ञांनी दिला. यामुळे गुलाबी बोंडअळीचा जीवनक्रम खंडित होऊन पुढील हंगामातील प्रादुर्भाव कमी करण्यास मदत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

कापूस संशोधन योजनेच्या प्रभारी अधिकारी डॉ. मेघा प्रदीप जगताप यांनी सांगितले की, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि, संचालक संशोधन डॉ. भगवान आसेवार आणि संचालक विस्तार शिक्षण डॉ. राकेश अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक कापूस दिनानिमित्त गावपातळीवर विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून कापूस उत्पादन व उत्पादकता वाढीसाठी विविध उपक्रम राबविले जात असून, कृषी विभाग, कृषी विद्यापीठे आणि शासकीय संस्थांच्या समन्वयातून आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविले जात आहे. 'कापूस कांती' उपक्रमातून उत्पादन खर्चात बचत, उत्पादकता व कापसाची गुणवत्ता वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. घन किंवा अतिघन पद्धतीने कापूस लागवड करताना योग्य पीक व्यवस्थापन केल्यास उत्पादन वाढण्यास मदत होऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

गावातील महिला शेतकरी गटाने केलेल्या कापूस लागवडीचे कौतुक करून विद्यापीठ, कृषी विभाग आणि भारतीय कापूस महामंडळाच्या सहकार्याने भविष्यातही महिला शेतकरी गटांना आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन देण्यात येईल, असे डॉ. जगताप यांनी सांगितले.

भारतीय कापूस महामंडळाचे वरिष्ठ वाणिज्य अधिकारी श्री. संजय एम. खोडके यांनी कापूस विक्री करताना गुणवत्ता जपण्याचे आवाहन केले. चांगल्या प्रतीचा कापूस, कचरा, कवडी किंवा कमी प्रतीचा कापूस वेगवेगळा वेचून स्वतंत्रपणे साठवावा. गुणवत्तेनुसार कापूस वर्गीकृत करून विक्री केल्यास चांगल्या प्रतीच्या कापसाला अधिक दर मिळण्याची शक्यता असते, असे त्यांनी स्पष्ट केले. भारतीय कापसाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत ओळख मिळवून देण्यासाठी 'कस्तुरी कापूस' हा ब्रँड विकसित करण्यात येत असून, बाजारपेठेतील गुणवत्ता व मागणीबाबत शेतकऱ्यांनी जागरूक राहावे, असे त्यांनी सांगितले.

जैनगिरीत शनिवारी महामस्तकाभिषेक महोत्सव

भाविकांसाठी विशेष बससेवा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : जटवाडा येथील प्रसिद्ध श्री १००८ संकटहर पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी येथे शनिवारी (१० ऑक्टोबर) शनिअमावस्येच्या शुभ मुहूर्तावर भव्य महामस्तकाभिषेक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता मंत्रोच्चारात पंचामृत महामस्तकाभिषेक सोहळ्याला सुरुवात होणार असून, नमोकार भक्ती मंडळाच्या वतीने संगीतबद्ध भक्ती सादर केली जाणार आहे.

यानंतर सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. जैन रॉकर्स ग्रुपचे चंद्रकुमार बाकलीवाल, धीरज कासलीवाल, नीरज काला, जितेंद्र पाटणी, सागर पाटणी, आशिष शहा, कुशल अजमेरा, हेमंत कासलीवाल, रोहित गंगवाल, रोहित कासलीवाल, सनी कासलीवाल, आनंद लोहाडे, स्वप्निल पांडे व ऋषी साहूजी यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे.

दूरच्या भाविकांसाठी '१००८ दर्शन' यूट्यूब चॅनेलवर सोहळ्याचे थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. तसेच रेल्वे स्टेशन, मध्यवर्ती बसस्थानक, लेबर कॉलनी, सिडको बसस्थानक व हर्सूल जेल येथून जटवाड्यासाठी विशेष सिटी बससेवा उपलब्ध करण्यात आली आहे.

सीड पेपरच्या निमंत्रणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

भास्कर आबा दानवेंकडून कौतुक

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

जालना : नवरात्र महोत्सवानिमित्त ज्वाला लॉन्स येथे ११ ते २० ऑक्टोबरदरम्यान आद्विक क्लबच्या वतीने 'रुबरू रास दांडिया'चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे निमंत्रण भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांना चित्रकूट निवास येथे देण्यात आले. यावेळी आद्विक क्लबच्या सदस्यांनी दानवे यांना सीड पेपरपासून तयार केलेली पर्यावरणपूरक निमंत्रण पत्रिका दिली. या कागदामध्ये विविध प्रकारच्या बियांचा समावेश असून, वापरानंतर हा कागद मातीत टाकून त्यावर पाणी दिल्यास त्यातून रोपटे उगवू शकते. उत्सवाच्या निमित्ताने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या संकल्पनेचे दानवे यांनी कौतुक केले. "उत्सवाच्या माध्यमातून मनोरंजनासोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणे ही चांगली संकल्पना आहे. आद्विक क्लबने सीड पेपरच्या माध्यमातून दिलेला पर्यावरणपूरक संदेश प्रेरणादायी आहे," असे दानवे म्हणाले.

या उपक्रमाचा प्रत्यक्ष प्रयोग म्हणून चित्रकूट निवास येथे सीड पेपर कुंडीतील मातीत दाबून त्यावर पाणी टाकण्यात आले. 'उत्सव साजरा करूया आणि पर्यावरणही जपूया' हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. दानवे यांनी 'रुबरू रास दांडिया'च्या आयोजनासाठी आद्विक क्लबच्या सदस्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रणय बागडी, संस्कार जैस्वाल, अभिषेक मुंदडा, भाजपा सरचिटणीस वसंत शिंदे, भाजपा जालना ग्रामीण तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, निवृत्ती गायकवाड, राजेश जोशी, बद्रीनाथ वाघ, शरद आमले आदी उपस्थित होते.

जिल्हा देखरेख सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी विलास भुमरे

गटसचिवांच्या अडचणी सोडविण्यासह कर्जावरील व्याजदरात कपातीचा निर्णय

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : औरंगाबाद जिल्हा देखरेख सहकारी संस्था मर्यादित, छत्रपती संभाजीनगरच्या अध्यक्षपदी औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष आमदार विलास भुमरे यांनी पदभार स्वीकारला. यानिमित्त जिल्हा गटसचिव संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष बाळासाहेब दौड यांनी भुमरे यांचा सत्कार केला.

यावेळी विलास भुमरे यांनी जिल्ह्यातील गटसचिवांच्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हा देखरेख सहकारी संस्थेच्या माध्यमातून प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने विविध कर्जांच्या व्याजदरात कपात केल्याची माहिती त्यांनी दिली. सोनेतारण कर्जाचा व्याजदर १३ टक्क्यांवरून ११ टक्के, गृहकर्ज व वाहनकर्जाचा व्याजदर ११.७५ टक्क्यांवरून ११ टक्के करण्यात आला आहे. वैयक्तिक कर्जाचा व्याजदर १३ टक्क्यांवरून १२ टक्के करण्यात आला असून, प्रक्रिया शुल्क एक टक्क्यावरून अर्धा टक्का करण्यात आले आहे. बँकेचा नफा वाढविण्यासाठी संचालक मंडळ व कर्मचारी प्रयत्नशील राहतील, असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ अंतर्गत प्राप्त झालेल्या ५ हजार २३२ कर्ज खात्यांच्या तपासणीचे काम लेखापरीक्षक विभागामार्फत सुरू आहे. हे काम विहित मुदतीत पूर्ण करून संबंधित माहिती पोर्टलवर अपलोड करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यासाठी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था आणि जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ यांच्या उपस्थितीत तालुका लेखापरीक्षक, उपलेखापरीक्षक व तालुका लोन ऑफिसर यांची संयुक्त बैठक घेण्यात आली.

कार्यक्रमात उपाध्यक्ष रामराव शेळके, संचालक रविंद्र काळे, संचालक संदिप निकम, जिल्हा उपनिबंधक समृत जाधव, विशेष जिल्हा लेखापरीक्षक सुरेश काकडे आणि संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी खोसे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बँकेचे सरव्यवस्थापक अण्णासाहेब वडेकर, शेतीकर्ज विभागप्रमुख विनोद शेंगुळे, जनार्धन जंजाळ यांच्यासह जिल्ह्यातील गटसचिव उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक महाराष्ट्र राज्य संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष प्रदीप हारदे यांनी केले. कार्यक्रमासाठी नामदेवराव खरात यांनी परिश्रम घेतले.

फुकट्या प्रवाशाकडून रेल्वेच्या तिकीट तपासणी मोहिमेत तीन तीन लाखाच्या दंडाची वसुली

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

रेल्वे म्हटलं की सरकारची रेल्वे म्हणून अनेक प्रवासी फुकट प्रवास करत असतात त्यांच्यावर अंकुश लावण्यासाठी प्रत्येक महिन्याला रेल्वे तपासणी काची एक टीम वेगवेगळ्या ठिकाणी तपासणी करत असतात त्याचाच एक भाग म्हणून परभणी स्टेशन येथेनांदेड रेल्वे विभागाच्या वतीने सर्व तिकीट तपासणी मोहिमेत एकूण 562 प्रकरणे आढळून आली असून अनियमित प्रवाशांकडून.3. लाख 33 हजार.15. रुपये इतकी रक्कम वसूल करण्यात आली.. रेल्वे विभागाने सोमवारी.दि.5. दुपारी.4.30. ते सायंकाळी.7. वाजेपर्यंत सर्व तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेचे निरीक्षण शैलेश कुमार सिंह. सहाय्यक वाणिज्य अधिकारी नांदेड. यांनी केले. या मोहिमेत.31. तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला असून 23 गाड्यांची तपासणी करण्यात आली. या तपासणीत विना तिकीट व अनधिकृत प्रवासांच्या 281 प्रकरणातून.1. लाख.10. हजार 745 रुपये अनियमित प्रवासाच्या.54. प्रकरणातून.27. हजार रुपये. अनबुक्ड लगेजच्या 227. प्रकरणातून.41. हजार 220. रुपये असे एकूण.562. प्रकरणातून.3.लाख.33. हजार.15. रुपये इतका दंड वसूल करण्यात आला. रेल्वे प्रशासनाने प्रवास सुरू करण्यापूर्वी वैद्य तिकीट घ्यावे आणि संपूर्ण प्रवासादरम्यान आवश्यक प्रवास प्राधिकरण जवळ ठेवावे नियमानुसार आवश्यक असल्यास सामानाचेही योग्य प्रकारे बुकिंग करावे. प्रवाशांनी तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांना सहकार्य करून रेल्वेच्या नियमांचे व सूचनांचे पालन करावे असे आवाहन केले आहे.

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना लोकश्रेय मित्र मंडळाची श्रद्धांजली

हिंदू प्रकाश वार्ता/प्रतिनिधी



परभणी**ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना गोवा येथे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्याने चित्रपट सृष्टीला व आमच्यासारख्या चहा त्या वर्गात एका प्रकारे फार मोठा धक्का बसल्याने नानाच्या या अकाली निधनाने चित्रपट सुष्टीला व चाहत्यांकडून दुख व्यक्त होत असल्याची प्रतिक्रिया लोकश्रेय चे संस्थापक अध्यक्ष सलीम इनामदार यांनी लोकश्रेय मित्र मंडळा च्या वतीने श्रद्धांजली अर्पण करता वेळी व्यक्त केली.

पांडुरंग रणखांब यांनी पडद्यावर हजारो भूमिका साकारल्या पण मनावरची छाप कायमची उंमटवली असा अभिनेता पुन्हा होणे नाही कला विश्वासातील या महान कलाकाराला श्रद्धांजली अर्पण करीत असल्याचे सांगितले

नाना पाटेकर यांचे सामाजिक क्षेत्रात फार मोठे योगदान होते

हे योगदान विसरता येत नाही तर नाना पाटेकर यांना अनेक राष्ट्रीय पुरस्कार सन्मान मिळविणारे नटसम्राट होते व. मतदार म्हणून आम्हाला किंमत आहे का अशी मुलाखत ही नाना पाटेकर यांनी घेतलेली होती गोवा येथील त्यांच्या राहत्या घरी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले ही बातमी कळताच देशभरातील व महाराष्ट्र राज्यातील चहा त्यांना एका प्रकारे फार मोठा धक्का बसला त्यांची अदाकारी व कलाकारी कायम स्मरणात राहील अशी व्यथा श्रद्धांजली अर्पण करताना मान्यवरांनी व्यक्त केली

यावेळी लहुजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष पांडुरंग रणखांब. अँड बाबासाहेब भालेराव ,भाजपशक्ती प्रमुख दीपक गवारे. प्राध्यापक लक्ष्मीकांत जिरेवाळ . विजय पानबुडे .शेख हबीब. कादर इनामदार. शेख जीशान मणियार. यांची यावेळी उपस्थिती होती

आचारसंहितेमुळे 12 ऑक्टोबरचा विभागीय लोकशाही दिन रद्द

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : पदवीधर मतदारसंघातील रिक्त जागांसाठी द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार छत्रपती संभाजीनगर विभागात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा विभागीय लोकशाही दिन यंदा ऑक्टोबर महिन्यातील दुसऱ्या सोमवारी, म्हणजेच १२ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार नाही, अशी माहिती विभागीय आयुक्त कार्यालयाचे अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) एम. आर. मिसकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

सेवा संकल्प अभियानातंर्गत खरदडी व पिंपळगावात आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



हिंदू प्रकाश वार्ता प्रातीनिधी

परभणी**सेवा संकल्प अभियानांतर्गत खरदडी आणि पिंपळगाव (ता. जिंतूर) येथे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले. या शिबिरात नागरिकांची उच्च रक्तदाब व रक्तातील साखरेची तपासणी करण्यात आली. तसेच गरोदर मातांची आरोग्य तपासणी करून त्यांना आवश्यक आरोग्यविषयक मार्गदर्शन व सल्ला देण्यात आला. 'तिशीचा पल्ला, आरोग्य अन् सल्ला' या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांनी नियमित आरोग्य तपासणी करण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. उच्च रक्तदाब व मधुमेहाचे वेळेवर निदान झाल्यास योग्य उपचार आणि जीवनशैलीतील बदलांद्वारे संभाव्य गुंतागुंत टाळता येते, याबाबत आरोग्य कर्मचाऱ्यांनी मार्गदर्शन केले. खरदडी येथे ३० वर्षांवरील नागरिकांची तपासणी तसेच गरोदर मातांची आवश्यक आरोग्य तपासणी करण्यात आली. तर ग्रामपंचायत पिंपळगाव येथेही सेवा संकल्प अभियानांतर्गत आरोग्य शिबिर घेऊन ग्रामस्थांची आरोग्य तपासणी करण्यात आली. गरोदर मातांना सकस आहार, नियमित तपासणी, औषधोपचार आणि माता-बाल आरोग्याबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या. ग्रामस्थांनी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद देत आरोग्य तपासणी करून घेतली.

नाविन्यपूर्ण संकल्पना' स्पर्धेतून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना; सेवा संकल्प अभियान व राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने नवकल्पना स्पर्धेचे आयोजन

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी



सोयगाव,दि.८ ऑक्टोबर : अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथे सेवा संकल्प अभियान,महाराष्ट्र राज्य व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने 'नाविन्यपूर्ण संकल्पना-स्पर्धा व नवकल्पना' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता,नाविन्यपूर्ण विचार,तांत्रिक कौशल्ये तसेच समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार होते. प्रमुख वक्त्या भाग्यश्री गजानन गवारे (विद्युत प्रशिक्षणक व केंद्र समन्वयक, बहुकौशल्य तंत्रज्ञ) यांनी विद्यार्थ्यांना नवकल्पना, कौशल्य विकास, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि नाविन्यपूर्ण विचार याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा व कौशल्यांचा उपयोग करून समाजोपयोगी तसेच रोजगारनिर्मितीला चालना देणाऱ्या नवकल्पना विकसित कराव्यात,असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,आयक्यूएसी समन्वयक डॉ.प्रमोद पवार,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.सुनील चौधरे तसेच भाग्यश्री पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.मनोजकुमार चोपडे यांनी केले.त्यांनी विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण कल्पनांना प्रत्यक्ष स्वरूप देण्यासाठी सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. आभार प्रदर्शन करिअर कट्टा तालुका समन्वयक डॉ.संतोष गुंतवणूक, रोजगार, उत्पादन व वर्षनिहाय नफ्याचा तपशील, तीन छायाचित्रे व ELP-1, मागील तीन वर्षांचे ताळेबंद व नफा-तोटा पत्रक तसेच कर्ज खाते नियमित असल्याबाबत संबंधित बँकेचे पत्र जोडणे आवश्यक आहे.

लघुउद्योगांना जिल्हा पुरस्काराची संधी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर - जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने सन २०२६ साठी उत्कृष्ट लघुउद्योग जिल्हा पुरस्कार योजना राबविण्यात येत असून, पात्र लघुउद्योगांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुक उद्योजकांनी आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यातील अर्ज ३० ऑक्टोबरपर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राच्या उपआयुक्त (उद्योग व सेवा) यांनी केले आहे. या पुरस्कार योजनेत प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास १५ हजार रुपये, तर द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यास १० हजार रुपये रोख, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात येणार आहे. दि. १ जानेवारी २०२६ पूर्वी स्थायी लघुउद्योग किंवा उद्यम नोंदणी झालेला आणि मागील दोन वर्षांपासून सातत्याने उत्पादन सुरू असलेला उद्योग या पुरस्कारासाठी पात्र राहणार आहे. तसेच संबंधित उद्योग कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसणे आवश्यक आहे. अर्जासोबत उद्यम नोंदणी प्रमाणपत्र, मागील पाच वर्षांतील

बिगबिलियनमोटोडील्स आता फ्लिपकार्ट बिग बिलियन डेजवर

मुंबई : मोटोरोला या मोबाइल तंत्रज्ञानातील जागतिक आघाडीची कंपनी आणि भारतातील अग्रगण्य एआय स्मार्टफोन ब्रँडने फ्लिपकार्टच्या बिग बिलियन डेज सेल 2026 दरम्यान आपल्या "इट्स द टाइम टू मोटो" मोहिमेचा भाग म्हणून #बिगबिलियनमोटोडील्स सह नवीन स्मार्टफोन पोर्टफोलिओवर धमाकेदार फेस्टिव्ह ऑफर्स आणल्या आहेत. फ्लॅगशिप वैशिष्ट्य असलेला मोटोरोला एज ७० फ्यूजन , खराखुरा फ्लॅगशिप किलर मोटोरोला एज ७० प्रो आणि एआय कॅमेरा पॉवरहाऊस मोटोरोला एज ७० प्रो+ पासून बॅटरी-केंद्रित मोटो जी३७ पॉवर आणि मोटोरोलाचा प्रीमियम फ्लॅगशिप मोटोरोला सिग्नेचर पर्यंत, हा ब्रँड या सणासुदीतील अपग्रेड्स नेहमीपेक्षा अधिक सुलभ करण्यासाठी सज्ज झाला आहे.

चोऱ्यांच्या घटनांपासून सावध रहा-सपोनि पवन इंगळे



अजिंठा प्रतिनिधी : सिल्लोड तालुक्यातील शिवना येथे ग्राम पंचायत कार्यालयात आजिंठा पोलीस प्रशासानकडून बैठक आयोजित करण्यात आली होती. पोलीस प्रशासनातर्फे व्यापारी, ग्रामस्थांना सतर्क राहण्याचे आवाहन अजिंठा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पवन इंगळे यांनी केले आहे. दुचाकी चोरीपासुन बचाव करण्यासाठी नागरिकांनी काळजी घ्यावी वाहन सुरक्षित व प्रकाश असलेल्या ठिकाणी पार्क करावे कागदपत्रे किंवा चाबी अतिरिक्त चाबी वाहनांजवळ ठेवू नये. संशयास्पद व्यक्ती वाहनांभोवती फिरताना आढळल्यास पोलिसांना कळवावे. जनावरे चोरीपासुन बचाव करण्यासाठी जनावरे रात्री सुरक्षित व बंदिस्त गोठ्यात ठेवावी गोठ्याला मजबूत दरवजा व कुलुप लावावे जनांवराना ओळख चिन्ह अथवा टॅग लावावे तसेच त्यांचे फोटो जतन करुन ठेवावे अनोळखी व्यक्ती किंवा वाहण जनावराची पाहाणी करतांना आढळल्यास तत्काळ पोलिसांना कळवावे. घर बंद करून बाहेर जाताना शेजारी अथवा विश्वासु व्यक्तीस माहिती द्यावी. घरात मोठा प्रमाणात रोख रक्कम व मुल्यवान वस्तू ठेवु नये . सीसीटीव्ही लावा ग्रामपंचायत प्रशासनाला धारेवर धरत बंद पडलेले कॅमेरे येता दोन दिवसात त्याची दुरुस्ती करुन चालु करा नागरिकांची सुरक्षितेची जवाबदारी आपली आहेत याची जाणीव ठेवा. चोरीच्या कोणतेही घटना निदर्शनास आल्यास स्वःताहुन कारवाई करु नका त्वरित पोलीस प्रशासनाला माहीती कळवा असे आवाहन सपोनी पवन इंगळे यांनी केले.

विहिरीत पडलेल्या सहा ते सात फुटी अजगराला वनविभागाने दिले जीवदान

सर्पमित्रांच्या अथक प्रयत्नातून अजगराचे यशस्वी रेस्क्यू; जंगल परिसरात सुरक्षित अधिवासात सोडले

सिल्लोड : तालुक्यातील अजिंठा वनविभागाच्या हद्दीतील राजनी शिवारात शेतातील विहिरीत पडलेल्या सुमारे सहा ते सात फूट लांबीच्या अजगराला वनविभाग आणि सर्पमित्रांच्या संयुक्त प्रयत्नातून मंगळवारी (दि. ६) सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. रेस्क्यू केलेल्या अजगराला वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली जंगल परिसरात सुरक्षित अधिवासात सोडण्यात आले.

राजनी शिवारातील रफीक पठाण यांच्या शेतातील विहिरीत अजगर पडल्याचे निदर्शनास आले. याची माहिती वनविभागाला मिळताच वनपरीक्षेत्र अधिकारी संतोष दोडके यांनी तात्काळ दखल घेत शिवना वनपाल दीपक सोनार यांच्यासह वनविभागाच्या पथकाला घटनास्थळी जाण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर मांडणा येथील सर्पमित्र रामेश्वर गाडेकर तसेच सर्पमित्र सोनवणे यांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले.



वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि सर्पमित्र घटनास्थळी दाखल झाल्यानंतर विहिरीची पाहणी करण्यात आली. अजगर विहिरीच्या तळाशी असल्याने त्याला बाहेर काढणे आव्हानात्मक होते. मात्र, सर्पमित्रांनी आवश्यक साधनांच्या मदतीने विहिरीत उतरून अत्यंत सावधगिरीने अजगराला ताब्यात घेतले. कोणतीही इजा होऊ न देता त्याचे यशस्वी रेस्क्यू करण्यात आले.

रेस्क्यू केलेला अजगर अंदाजे सहा ते सात फूट लांबीचा असून त्याचे वय सुमारे सहा ते सात वर्षे असावे, अशी माहिती सर्पमित्र रामेश्वर गाडेकर यांनी दिली. रेस्क्यू केल्यानंतर वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली अजगराला जंगल परिसरात सुरक्षित ठिकाणी सोडण्यात आले.

साप आढळल्यास वनविभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन : घराच्या परिसरात अथवा शेतशिवारात साप आढळल्यास त्याला मारू नये. वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांनी तात्काळ वनविभाग किंवा अधिकृत सर्पमित्रांशी संपर्क साधावा, असे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली रेस्क्यू : अजगर रेस्क्यू मोहीम अजिंठा वनपरीक्षेत्र अधिकारी संतोष दोडके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. वनविभागाची तत्परता आणि सर्पमित्रांच्या धाडसी प्रयत्नांमुळे अजगराला जीवदान मिळाले. त्याला पुन्हा नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे सोडण्यात आले.

या रेस्क्यू ऑपरेशनदरम्यान अजिंठा येथील आरिफ खान, शिवना वनपाल दीपक सोनार, वसई वनरक्षक सोनवणे, वनरक्षक सिद्धार्थ वैष्य, वनरक्षक दिनेश वाघ यांच्यासह वनविभागाचे कर्मचारी व सर्पमित्र उपस्थित होते.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहा; कर्जवाटप व पुनर्गठनाची प्रक्रिया सुलभ करा

पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांचे बँक अधिकाऱ्यांना निर्देश

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी : परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कर्जवाटप, कर्ज पुनर्गठन तसेच कर्जमाफीच्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणी तातडीने सोडवून त्यांना सर्वतोपरी सहकार्य करावे, असे निर्देश पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी जिल्ह्यातील सर्व बँकांच्या अधिकाऱ्यांना दिले.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शेतकरी भवन येथे जिल्ह्यातील बँकांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी अपर जिल्हाधिकारी शोभा जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांच्यासह जिल्ह्यातील विविध बँकांचे प्रमुख अधिकारी, शाखाधिकारी तसेच शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. कर्जमाफीची प्रक्रिया झाल्यानंतर अनेक शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज मिळविताना तसेच कर्ज पुनर्गठन करताना बँक स्तरावर



विविध अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या अडचणी प्राधान्याने सोडविण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी बँक अधिकाऱ्यांना दिल्या.

परभणी जिल्ह्यात सुमारे १ लाख ६० हजार शेतकरी कर्जमाफीच्या कक्षेत असून, त्यापैकी ७९ हजार २१८ शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर सुमारे ६७२ कोटी रुपयांची कर्जमाफीची रक्कम बँक स्तरावर जमा झाल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. उर्वरित पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावरही टप्प्याटप्प्याने कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात येणार आहे.

कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना संबंधित बँकेने नवीन पीक कर्ज उपलब्ध करून देणे आवश्यक असून, चालू वर्षाच्या 'स्केल ऑफ फायनान्स'नुसार पीक कर्ज देण्यात यावे, असे निर्देश पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले.

सध्या जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, अशा कठीण काळात शेतकऱ्यांच्या अडचणींकडे अत्यंत संवेदनशीलतेने पाहणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. बँकांनी शेतकऱ्यांना कर्जवाटप, कर्ज पुनर्गठन, नवीन कर्ज तसेच इतर बँकिंग सुविधांसाठी सुलभ व पारदर्शक कार्यपद्धती उपलब्ध करून द्यावी. शेतकरी हिताला प्राधान्य देऊन त्यांच्या अडचणी तातडीने दूर कराव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

"शेतकऱ्यांच्या कामात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही. दुष्काळासारख्या कठीण परिस्थितीत राज्य सरकार शेतकऱ्यांच्या सर्व प्रश्नांवर सकारात्मकपणे काम करत आहे. त्याचप्रमाणे बँकांनीही शेतकऱ्यांना आवश्यक सहकार्य करून त्यांच्या पाठीशी उभे राहावे," असे पालकमंत्री यांनी सांगितले.

यावेळी जिल्ह्यातील सर्व बँकांचे प्रमुख अधिकारी, कर्मचारी शाखाधिकारी, पदाधिकारी, शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.

परभणी जिल्ह्यात आधीच दुष्काळाचा बोजवारा; उन्हाचा तापला पारा 35 ते 40 अंशावर

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**ह्यावर्षी पावसाळ्यातील ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात पावसाने मोठा खंड दिल्याने गंभीर जलसंकट उध्दवल्याच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी उपलब्ध पाणीसाठ्यानुसार पिकांचे नियोजन करावे. फळपिके आणि मुख्यपिकांना आवश्यकतेनुसार सूक्ष्म सिंचनाद्वारे पाणीपाळी द्यावी. जल संकटाच्या पार्श्वभूमीवर चारा पिकास प्राधान्य द्यावे...

हवामानशास्त्र. वनामकक्षवि..

यंदा आणि पावसाळ्यात पावसाचा मोठा खंड पडल्याने तसेच प्रशांत महासागरातील एल निनोच्या प्रभावामुळे प्रजन्यमानात मोठी घट झाली. परिणामी शेतकऱ्यांचा महत्त्वाचा असलेला खरीप हंगाम हातातून गेला. आता शेतकऱ्यांचा आर्थिक जोलारा पूर्णपणे रब्बी हंगामावर अवलंबून असताना आणि जल संकट पुढे असून उभे असताना ऑक्टोंबर महिन्यातच तापमान.35.ते.40. अंश सेल्सिअसचा पारा ओलांडल्याने शेतकरी आणि नागरिकांत भूषण दुष्काळाच्या संकटाच्या पार्श्वभूमीवर काळजीचे ढग अजूनच गडद झाले आहेत.

दरवर्षी.10. ऑक्टोंबर पर्यंत माघार घेणारा पाऊस यंदा मात्र.दि.3. ऑक्टोंबरलाच पुढे सरकला आहे. त्यामुळे आता पावसाच्या सर्व शक्यता मावळल्या आहेत. त्यामुळे दरवर्षी पेक्षा किमान.2.ते.3. अंश सेल्सिअसचे तापमानात वाढ झाली आहे. मागील काही दिवसांपासून परभणी जिल्ह्याच्या तापमानात सातत्याने वाढ झाली असून मागील दोन दिवसांपासून तापमानाने.35.ते.40. अंशांची पातळी ओलांडली आहे. याबाबत येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या हवामानशास्त्र विभागाने घेतलेल्या नोंदणी नुसार.

दि. कमाल..किमान :30. सप्टेंबर..34.9....19.9, 01 ऑक्टोंबर.35.2....19.5, 02.ऑक्टोंबर.35.2....19.9, 03.ऑक्टोंबर 34.6....18.2, 04 ऑक्टोंबर.34.8....18.0, 05 ऑक्टोंबर.35.2....16.1

कितीही दुष्काळ आला तरीही शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही : एकनाथ शिंदे

सेवा संकल्प अभियानांतर्गत सायकल वाटप शिलाई मशीन वाटप व रुग्णवाहिकेचे लोकार्पण

हिंदू प्रकाश वार्ता/अशोक पवार.

परभणी**महाराष्ट्र राज्यावर कितीही संकटे आली आणि दुष्काळाचे सावट असले तरीही माझ्या लाडक्या बहिणी व लाडके भाऊ संकटात असल्यामुळे बळीराजाच्या घरी शिवसेनेच्या माध्यमातून मदतीचा हात देण्याचा संकल्प केला आहे. दुष्काळी परिस्थिती ही केंद्र सरकार व राज्य सरकारच्या शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे प्रत्येक वर्षी शेतकऱ्यांना कुठल्या ना कुठल्या संकटाचा सामना करावा लागतो मागच्या वर्षी अतिवृष्टीमुळे शेतकरी संकटात सापडला होता. यावर्षीही दुष्काळाने सर्व पिके नापीके झाले तरीही राज्य सरकार



शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर उभे असून हिंदू धर्माचा सर्वात मोठा संधीपोळी आहे कितीही संकट आले तरीही शेतकऱ्यांची दिवाळी ही काळी होऊ देणार नाही असा शब्द राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना जीवनावश्यक वस्तूची वाटप करताना परभणी येथे दिनांक 7 ऑक्टोबर बुधवार रोजी इंदिरा गांधी स्टेडियम मैदानात झालेल्या सभेत दिला दिला.

मी पण एक शेतकऱ्याचा पुत्र आहे मला शेतकऱ्याच्या दुःखाची जाणीव आहे शेतकऱ्यांना मी वाऱ्यावर सोडणार नाही शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये व आपला धीर सोडू नये अडचणी ऐकण्यासाठी सर्वजण तुमच्या सोबत आहेत तुमच्यावर असलेली कर्ज वसुली सांगू तुमच्याकडे असलेल्या जनावरांसाठी चाऱ्या पाण्याची सोय करू तुमच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा फी रद्द करू सर्व काही देऊ हा शब्द देण्यासाठीच मी परभणीत आलो आहे शिवसेनेने आतापर्यंत 80 टक्के समाजकारण आणि 20% राजकारण केलेले आहे हा शब्द शिवसेना कायम टिकवून ठेवणार आहे परंतु आता सर्व शेतकऱ्यांच्या साठी शंभर टक्के समाजकारण करणार आहे शिवसेना यामध्ये कुठलेही राजकाल करणार नाही सरकारच्या तिजरो पहिला हक्क बळीराजाचाच आहे त्याच्यासाठी आज आकरता घेता येणार नाही यावेळीच्या दसरा मेळाव्याला मी मुंबईहून ला न येत शिवसेनेच्या लोकप्रतिनिधींनी पदाधिकारी कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या घरी जाऊन त्यांना मदत करा शेतकरी चआपला सर्वस्व आहे. या दुष्काळाच्या काळात त्यांना सरळ हाताने मदत करणार कसोटीचा काळ आहे हार म्हणायची नाही खचून जायचे नाही सरकार तुमच्या पाठीशी


सचिन दौड व वैशाली बावस्कर (दौड) यांना 'निसर्गोपचार गौरव सन्मान 2026'

निसर्गोपचार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची राज्यस्तरीय दखल; बुलडाणा येथे मान्यवरांच्या हस्ते गौरव

अजिंठा प्रतिनिधी सय्यद जमीर

निसर्गोपचार क्षेत्राच्या माध्यमातून आरोग्यसेवा, रुग्णसेवा आणि आरोग्यविषयक जनजागृतीसाठी उल्लेखनीय कार्य करणारे माऊली निसर्गोपचार केंद्र व नस क्लिनिक, सिल्लोड येथील सचिन अशोकराव दौड आणि वैशाली भीमराज बावस्कर (दौड) यांना प्रतिष्ठेच्या 'निसर्गोपचार गौरव सन्मान २०२६' पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्या कार्याची दखल घेत मिळालेल्या या सन्मानामुळे सिल्लोडच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

४ ऑक्टोबर २०२६ रोजी बुलडाणा येथील भातृमंडळ हॉलमध्ये आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन,



ए.जी.एम.ए. तसेच योगा निसर्गोपचार चिकित्सक असोसिएशन यांच्या वतीने आयोजित भव्य सोहळ्यात सचिन दौड व वैशाली बावस्कर (दौड) यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

निसर्गोपचाराच्या माध्यमातून समाजामध्ये आरोग्यविषयक जनजागृती निर्माण करणे, रुग्णांना सेवा देणे तसेच निरोगी जीवनशैलीबाबत माहिती पोहोचविणे, या कार्याची पुरस्काराच्या माध्यमातून दखल घेण्यात आली.

या सोहळ्यास बुलडाणा मतदारसंघाचे आमदार संजयभाऊ गायकवाड, नगराध्यक्षा सौ. पूजाताई गायकवाड, डॉ. सचिन सुपे, डॉ. त्रिदीप गुहा, डॉ. प्रशांत कपाले यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती होती. तसेच आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबुराव कानडे, व्हाईस चेअरमन नितीनराजे पाटील यांच्यासह महाराष्ट्रातील अनेक निसर्गोपचार तज्ज्ञ उपस्थित होते.

सचिन अशोकराव दौड आणि वैशाली भीमराज बावस्कर (दौड) यांना मिळालेला हा सन्मान त्यांच्या सातत्यपूर्ण कार्याची प्रेरणादायी पावती मानला जात आहे. या गौरवामुळे माऊली निसर्गोपचार केंद्र व नस क्लिनिक, सिल्लोड यांच्या कार्याला व्यापक स्तरावर ओळख मिळाली आहे. निसर्गोपचार क्षेत्रातील कार्य अधिक व्यापक करण्यासोबतच समाजामध्ये आरोग्यविषयक जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यासाठी हा सन्मान निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल सचिन दौड व वैशाली बावस्कर (दौड) यांचे सिल्लोडसह परिसरातील विविध क्षेत्रांतून अभिनंदन होत असून, त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

मिन्नू पी.एम. यांच्या उपस्थितीत वेरुळ लेणी परिसरातील अतिक्रमण हटविले

घाण करणाऱ्या दुकानदारांवर दंडात्मक कारवाई; 15 हजारांचा दंड वसूल, अतिक्रमित जागेवर वृक्षारोपण

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : सेवा संकल्प अभियानांतर्गत वेरूळ लेणी परिसरातील महावीर स्तंभ चौकात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. यांच्या उपस्थितीत झालेल्या या मोहिमेत परिसरात अस्वच्छता करणाऱ्या दुकानदारांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. अतिक्रमणे हटवून १५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. अतिक्रमित जागेवर वृक्षारोपणही करण्यात आले.

मिन्नू पी.एम. आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक वासुदेव सोळंके यांनी बुधवारी वेरूळ लेणी परिसराची पाहणी केली. यावेळी अस्वच्छता करणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करून अतिक्रमणे हटविण्यात आली. ही कारवाई रात्री ९ वाजेपर्यंत सुरू होती. गुरुवारी सकाळी ६ वाजता पुन्हा स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये उपविभागीय दंडाधिकारी संतोष गोराड, गटविकास अधिकारी गिरीश सोनार, पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्यासह पंचायत समितीचे कर्मचारी, ग्रामसेवक, महिला बचत गटांच्या सदस्य, आशा वर्कर आणि अंगणवाडी सेविकांनी सहभाग घेतला.

वेरूळ लेणी परिसरात नियमित स्वच्छता राखण्यासह अस्वच्छता करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश ग्रामपंचायतीला देण्यात आले. भारतीय पुरातत्त्व विभागालाही परिसरात नियमित स्वच्छता राखण्याच्या सूचना देण्यात आल्या.

मेडिकल दुकानात औषध घेण्यावरून वाद; तरुणावर कुऱ्हाडीने हल्ला

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : वडिलांसाठी औषध घेण्यासाठी मेडिकल दुकानात गेलेल्या १९ वर्षीय तरुणावर किरकोळ कारणावरून कुऱ्हाडीने हल्ला केल्याची घटना २ ऑक्टोबर रोजी रात्री दीडच्या सुमारास टी.एच. सेंटर, जिजाऊ चौक परिसरातील वेलनेस मेडिकल येथे घडली. या प्रकरणी शेख रेहान शेख नासेर याने पोलिसांत तक्रार दाखल केली असून, प्रशांत ऊर्फ जलींदर आहेर रा. एन-२, रोड, याच्याविरुद्ध कायदेशीर तक्रार करण्यात आली आहे. तक्रारीनुसार, रेहान हा त्याचा मित्र शहाब शेख याच्यासोबत वडिलांसाठी औषध आणण्यासाठी मेडिकलमध्ये गेला होता. त्यावेळी काउंटरवर एक मुलगा उभा होता. औषध घेण्यासाठी पैसे देण्यावरून शहाब व त्या तरुणामध्ये शाब्दिक वाद झाला. त्यानंतर शहाबने मेडिकलमध्ये औषध घेतल्याचे सांगून पैसे देण्यास नकार दिल्याने वाद आणखी वाढला.

याचदरम्यान संशयित प्रशांत ऊर्फ जलींदर आहेर तेथे आला. त्याने शहाबसोबत वाद घालत रेहानच्या डोक्याच्या बाजूला कुऱ्हाडीने घाव केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. हल्ल्यात रेहानच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर त्याला उपचारासाठी एस.एम.एस. हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. या घटनेनंतर संशयिताने पुन्हा मारहाण केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. हल्ल्यात जखमी झालेल्या रेहानने पोलिसांकडे जबाब नोंदवून संबंधितावरुद्ध कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे. त्याचा जबाब संमिश्र पद्धतीने नोंदविण्यात आला असून, प्रकरणाचा पुढील तपास पोलिस करीत आहेत.

कर्जप्रकरणे रखडली; २३४ प्रस्तावांचा तातडीने निपटारा करा

सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगांना गती देण्याचे जिल्हाधिकारी विनय गौडा यांचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेतून मिळणारे अर्थसहाय्य लाभार्थ्यांना वेळेत मिळावे, यासाठी प्रलंबित कर्जप्रकरणांचा तातडीने निपटारा करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी दिले. योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी गौडा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी सन २०२६-२७ साठी वैयक्तिक लाभार्थी घटकाचे ६०३ प्रकरणांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आल्याची



माहिती देण्यात आली. त्यापैकी २२४ प्रकरणांना मंजुरी मिळाली असून, बँक स्तरावर तब्बल २३४ कर्जप्रकरणे प्रलंबित आहेत. ही प्रकरणे तातडीने निकाली काढून पात्र लाभार्थ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी बँकांना दिल्या.

अर्जांची वेळेत छाननी करून पात्र प्रस्ताव बँकांकडे पाठवावेत, तसेच प्रलंबित प्रकरणांचा नियमित पाठपुरावा करावा, असेही त्यांनी सांगितले. जिल्हा संसाधन व्यक्तींमार्फत लाभार्थ्यांना मार्गदर्शन करून अर्जांमधील त्रुटी दूर करण्यावर भर देण्याचे निर्देश देण्यात आले.

दरम्यान, योजनेतून कर्ज घेतल्यानंतर नियमित परतफेड न करणाऱ्या व थकबाकीदार लाभार्थ्यांची अद्ययावत यादी संबंधित बँकांनी सादर करावी, असेही जिल्हाधिकारी गौडा यांनी स्पष्ट केले. कर्जमंजुरीतील अडचणी दूर करण्यासाठी बँका आणि संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून नवीन उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळवून द्यावा, असे त्यांनी सांगितले.

बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप गवळी, गटविकास अधिकारी शिवाजी साळुंखे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रेषित मोघे, नाबार्डचे जिल्हा उपव्यवस्थापक निलेश गावित यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

टंचाईतून दिलासा देण्यासाठी प्रशासनाची धावपळ; चारा, पाणी अन् रोजगाराला प्राधान्य

दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत पोहोचवा; टँकरवर जीपीएसने नजर ठेवण्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील टंचाई निवारणाच्या उपाययोजनांना वेग देण्याचे निर्देश पालकमंत्री संजय शिरसाट यांनी दिले. चारा उत्पादन वाढविणे, गाळ काढून तो शेतकऱ्यांच्या शेतात पोहोचविणे, पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे, शेतकऱ्यांना मदत तसेच शेतमजुरांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देण्यास प्राधान्य द्यावे, असे त्यांनी स्पष्ट केले. जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीच्या बैठकीत पालकमंत्री शिरसाट यांनी दुष्काळ निवारणाच्या कामांचा आढावा घेतला. जिल्ह्यातील उपलब्ध पाणीसाठा, चाऱ्याची स्थिती, पाणी वितरण आणि सुरू असलेल्या कामांची माहिती त्यांनी घेतली. जिल्ह्यात बाहेरून चारा मागविण्याची वेळ येऊ नये, यासाठी चारा उत्पादनाला चालना देण्याच्या सूचना त्यांनी केल्या. वैरण विकास कार्यक्रमातून चारा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देण्यासह कालव्यालगतच्या शेतकऱ्यांना चारा पिकांच्या लागवडीसाठी प्रोत्साहन देण्याचे त्यांनी सांगितले.

गंगापूर तालुक्यात गोदावरी नदीकाठासह धरणांच्या बॅकवॉटर क्षेत्रात चारा लागवडीची शक्यता असल्याचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी बैठकीत सांगितले. जिल्ह्यातील मुरघास उत्पादकांकडून चारा उपलब्ध करून घेत भविष्यातील पशुखाद्याची सुरक्षितता करण्यावरही चर्चा झाली. टंचाईच्या काळात पाणीपुरवठ्याच्या व्यवस्थेत कोणतीही कुचराई होऊ नये, यासाठी टँकरच्या वाहतुकीवर जीपीएसद्वारे देखरेख ठेवावी.



जिल्हा मुख्यालयातून त्याचे नियंत्रण करण्याची यंत्रणा सक्षम करावी. पाण्याची आवर्तने आणि वितरणाचे काटेकोर वेळापत्रक तयार करून त्यानुसार पाणीपुरवठा करावा, असे निर्देश शिरसाट यांनी दिले.

गाळ काढण्याच्या कामालाही प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी केल्या. काढलेला गाळ शेतकऱ्यांच्या शेतात विनामूल्य पोहोचविण्याची व्यवस्था करावी, जेणेकरून टंचाई निवारणासोबतच शेतजमिनीच्या सुपीकतेलाही त्याचा फायदा होईल, असे त्यांनी सांगितले. सुरू असलेल्या कामांची प्रत्यक्ष क्षेत्रभेट घेऊन दैनंदिन व साप्ताहिक अहवालाच्या माध्यमातून त्याचा नियमित आढावा घेण्याचेही निर्देश देण्यात आले.

दिवाळीपूर्वी मदतीचे नियोजन दुष्काळ निवारणाच्या कामांसाठी स्वयंसेवी संस्था आणि उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीचा प्रभावी वापर करावा. संस्थांना व उद्योगांना सहभागी करून मदत मिळवावी. प्राप्त होणाऱ्या तसेच वितरित केल्या जाणाऱ्या मदतीचा निधी आणि वस्तूंची नोंद ठेवण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष उभारावा, असेही पालकमंत्र्यांनी सांगितले. शेतमजुरांना रोजगारासाठी दूर जावे लागू नये, यासाठी स्थानिक पातळीवरच कामे उपलब्ध करून द्यावीत. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचेल, याचे नियोजन करा. राज्यासाठी आदर्श ठरतील अशा टंचाईमुक्तीच्या उपाययोजना जिल्ह्यात राबवा, असे आवाहन शिरसाट यांनी प्रशासनाला केले. बैठकीस जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911